**प्रसिध्दी पत्रक** 　　　　　　　　　　　　　　**दिनांक** 30/10/2024

**आरोपी इतर लोकसेवक**- महेश गजानन देवगिरीकर, वय 35 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- तांत्रिक अधिकारी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कक्ष, पंचायत समिती सिल्लोड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) यांनी तक्रारदार यांच्याकडून रुपये 6000/- लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिल्लोड शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | महेश गजानन देवगिरीकर, वय 35 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- तांत्रिक अधिकारी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कक्ष, पंचायत समिती सिल्लोड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) |
| लाच मागणी रक्कम | :- | 6000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | निरंक |
| सापळा अधिकारी<br>सह सापळा अधिकारी | :-<br>:- | श्री. अमोल धस, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. चैनसिंग घुशिंगे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | शेतीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर विहिरीचे कुशल कामाचे बिलाची फाईल दाखल करुन मंजुर करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांचे आईचे नावावर असलेल्या शेतीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजुर विहिरीचे कुशल कामाचे 1,05,856/- रुपये बिलाची फाईल दाखल करुन मंजुर करण्यासाठी इलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे पंच साक्षीदार समक्ष 6,000/- रुपये लाचेची मागणी दिनांक 04/10/2024 रोजी केली, इलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन सिल्लोड शहर, ता. सिल्लोड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा.मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक मा. सुरेश नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल धस यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस अंमलदार युवराज हिवाळे, चालक पोह. देवसिंग टाकुर यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

30/10/2024
( सुरेश ह. नाईकनवरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.